नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 25/01/2024 (गुरूवार) सायंकाळ

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
## वाहनासह एकुण ०१ कोटी ३७ लाख ६८ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त
## विशेष पथकाची कारवाई

दिनांक २५/०१/२०२४ चे ००.३० वा. ००.४० वा. दरम्यान मा. पोलीस अधिक्षक यांचे विशेष पथकातील स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना मारोडी मौदा येथे १) टाटा कंपनीची १६ चक्का एल.पी क्र. एम. एच–३२/ए.जे–७७७२ २) टाटा कंपनीची १६ चक्का एल.पी क्र. एम.एच–३२/ए.जे ६७८६ ३) एक अशोक लेलॅंड कंपनीची १४ चक्का एल.पी क्र. एम.एच–४०/सीएम–७२१६ वाहनात भंडारा कडुन मौदा नागपूर मार्ग वर्धा आणि यवतमाळ मार्गे अवैधरीत्या विनापरवाना रेतीची चोरटी करीत आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून स्टाफने वाहनांना थांबवून पाहणी केली असता तिन्ही वाहनामध्ये प्रत्येकी अंदाजे १४ ब्रास रेती मिळून आल्याने सदर ट्रक चालकास ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपींच्या ताब्यातून १) टाटा कंपनीची १६ चक्का एल. पी. क्र. एम. एच–३२/ए. जे–७७७२ किंमती ४५ लाख ज्यामध्ये १४ ब्रास रेती प्रत्येकी ५०००/–रू. अशी एकुण ७०,०००/–रू. २) टाटा कंपनीची १६ चक्का एल.पी क्र. एम.एच–३२/ए.जे.–६७८६ किंमती १४ ब्रास प्रत्येकी ५०००/–रू. अशी एकुण ७०,०००/–रू. ३) एक अशोक लेलॅंड कंपनीची १४ चक्का एल.पी क्र. एम.एच–४०/सीएम–७२१६ किंमती ४५ लाख मध्ये १४ ब्रास रेती प्रत्येकी ५०००/–रू. अशी एकुण ७०,०००/–रू., ०५ मोबाईल किंमती ५८,०००/– असा एकुण ०१ कोटी ३७ लाख ६८ हजार रूपयाचा मुद्देमाल जप्त करून **आरोपी नामे– १) ज्ञानेश्वर प्रेमदास मैंद, रा. अष्टविनायक ले आउट पिपरी वर्धा २) सुमीत बंडु वाडीभस्मे, रा. खैरी दिवान पवनी मौदा ३) मोषीन खान, रा. जाकीर हुसैन कॉलनी वर्धा ४) गजानन शिवराम बकाल, रा. जंगलापुर जि. मौदा ५) ईरषाद उर्फ बबलु सिकंदरखा पठाण, रा. सेलु पोलीस ठाण्याच्या मागे, वर्धा मौदा ६) जफरखान अयुबखान पठाण, रा. यवतमाळ मौदा ७) शेख सलीम शेख अहमद, रा. कंभारपुरा मौदा ८) मोहम्मद सलीमरा रा. मौदा** असे एकुण ०८ आरोपी यांचेविरुद्ध कलम ३७९, १०९, ३४ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. मौदा येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक श्री. अमित पांडे, पोलीस हवालदार ललीत उईके, पोलीस नायक प्रणय बनाफर, पोलीस अंमलदार कार्तिक पुरी, बालाजी बारगुले, शुभम मोरोकार विशेष पथक नागपूर ग्रामीण यांनी केली.


MOIN
KHAN
TATA
GOOD


GOODS
CARRIER
ALL INDIA
PERMIT
MASHA
ALLAH
MADINA
TATA
4825c
GOOD
MH-32
AJ.7772
Night
GREEN
JAGUAR
Rider

## पोलीस स्टेशन कोंढाळी येथील बस स्टॉपवर ७६ वर्षाचे वृद्ध इसम मिळाले बेवारस स्थितीत

दिनांक २४.०१.२०२४ रोजी संध्याकाळी १९.३० वाजता माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन कोंढाळी येथील बस स्टॉप वर ७६ वर्षाचे वृद्ध इसम बेवारस स्थितीत पडलेले आहेत.

तरी तेथे जाऊन त्यांना विचारपूस केली असता त्यांनी त्यांचे नाव मोहन तुकडोजी चव्हाण, रा. वर्धा असे सांगितले. त्यांना व्यवस्थित बोलता येत नव्हते तरी त्यांचे वैद्यकीय उपचार शासकीय रुग्णालय कोंढाळी येथे करून, त्यांना कपडे व औषध उपचार देऊन त्यांचे नातेवाईक यांचा शोध होणे करिता शोध पत्रिका पाठवण्यात आलेले असुन त्यांना सुरक्षा व देखभालचे दृष्टिकोनातून वृद्धाश्रम, बुट्टीबोरी येथे दाखल करण्यात आले असून त्यांचे नातेवाईकांचा शोध घेणे सुरू आहे.



## सराईत गुन्हेगार राहुल वासुदेव ठाकुर, यास केले ६ महिन्याकरीता हद्दपार

पोलीस स्टेशन सावनेर येथील इस्ते. नं. ८/२३ कलम ५६(अ), (ब) म.पो.का. मधील **आरोपी नामे— राहुल वासुदेव ठाकुर, वय ३२ वर्ष रा. टाकळी भन्साळी ह.मु. N-K- बारचे मागे सावनेर** यास मा. S-D-M. साहेब सावनेर यांचे आदेशाने सदर आरोपी यास नागपुर शहर व नागपुर ग्रामीण कार्यक्षेत्रातुन ६ महिण्याकरीता हद्दपार करण्यात आल्याने सदर आरोपी यास दिनांक २४/०१/२०२४ रोजी पो.हवा. शेरे ब.नं. १८१६ व पो.शि. अशोक ब.नं. १४५ यांचे हस्ते पो.स्टे. शिंदी रेल्वे वर्धा हद्दीतील आरोपी याचे नातेवाईक संजय बालचंद गहरुले वय ५२ वर्ष रा. सिलडोह ता. सेलू जिल्हा वर्धा याचे ताब्यात देण्यात आले.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर